असा. क्र. ४२ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

शनिवार, ऑगस्ट २१, २००४ / श्रावण ३०, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५.**—महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. ४१२-४१५

### ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ ऑगस्ट २००४

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXV OF 2004.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६२ चा महा. ५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २००४ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यात कलम २५७क समाविष्ट करणे.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम २५७ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६२ चा महा. ५.

गटाची किंवा गटांची विभागणी आणि तिचे परिणाम.

" **२५७क.** (१) कोणत्याही विद्यमान पंचायत समितीच्या सदस्यांच्या पदावधीमध्ये, राज्य शासनाने, कलम २५६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (घ) व कलम ५ अन्वये, एखाद्या किंवा अनेक गटांची विभागणी करून त्या गटाच्या किंवा गटांच्या जागी दोन किंवा अधिक गटांची रचना करणारी अधिसूचना काढली असेल आणि अशा नवीन गटाची किंवा यथास्थिति गटांची रचना केल्याच्या परिणामी, कलम २५७ च्या खंड (दोन) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, वगळलेल्या क्षेत्राचे वा क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, विद्यमान पंचायत समितीच्या अथवा समित्यांच्या सदस्यांना काढून टाकणे आवश्यक असेल आणि कलम ५६ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, यथास्थिति, नवीन पंचायत समिती अथवा समित्या स्थापन करणे आवश्यक असेल त्याबाबतीत, या अधिनियमाच्या कलम २५७ मध्ये किंवा अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) कलम २५६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (घ) अन्वये काढलेल्या अधिसूचनेद्वारे, यथास्थिति, विद्यमान गटातून किंवा गटांतून अशाप्रकारे वगळलेले वा वगळलेली आणि नवीन गटाची किंवा गटांची रचना करीत असल्याचे अधिसूचित केलेले वा केलेली, क्षेत्र वा क्षेत्रे, कलम ५६ अन्वये, अशा गटासाठी किंवा गटांसाठी नवीन पंचायत समिती किंवा समित्या म्हणून स्थापन केल्याचे मानण्यात येईल ;

(ख) विद्यमान गटातून किंवा गटांतून वगळलेल्या क्षेत्राचे वा क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणारे आणि कलम २५७ च्या खंड (दोन) अन्वये अशाप्रकारे काढून टाकलेले सदस्य हे, अशा नव्याने स्थापन केलेल्या पंचायत समितीचे किंवा यथास्थिति समित्यांचे निर्वाचित सदस्य असल्याचे मानण्यात येईल आणि हे सदस्य, या अधिनियमाच्या अनुक्रमे कलम ६७ व कलम ६८ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, आपल्या मधूनच आपला सभापती आणि उप सभापती निवडतील ;

(ग) खंड (क) अन्वये नवीन पंचायत समिती किंवा समित्या स्थापन झाल्यावर, राज्य शासन, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, विद्यमान पंचायत समितीच्या किंवा समित्यांच्या हक्कांचे व दायित्वांचे, नव्याने स्थापन झालेल्या उत्तराधिकारी पंचायत समितीकडे किंवा, यथास्थिती समित्यांकडे, पूर्णतः वा अंशतः हस्तांतरण करण्याची आणि अशा हस्तांतरणाच्या अटी व शर्तीची, तसेच कलम २५६ अन्वये काढलेली अधिसूचना अंमलात आणण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर आनुषंगिक, परिणामरूप व पूरक बाबींची तरतूद करील ; आणि

(घ) पंचायत समित्यांच्या बाबतीतील, या अधिनियमाच्या सर्व संबद्ध तरतुदी, अशा नव्याने स्थापन केलेल्या पंचायत समितीला किंवा समित्यांना लागू असतील.

(२) नव्याने स्थापन केलेल्या पंचायत समितीचा आणि तिच्या सदस्यांचा पदावधी हा, ज्या पंचायत समितीची विभागणी करून नवीन पंचायत समिती स्थापन केली असेल त्या विद्यमान पंचायत समितीबरोबर एकाच वेळी समाप्त होईल.".

## निवेदन.

शासनाने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये नवीन महसुली तालुके निर्माण केल्यावर, सर्वसाधारणपणे, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.५) याच्या कलम ५ खाली स्थापन करण्यात आलेल्या गटाची किंवा गटांची आणि अशा गटांच्या संबंधित पंचायत समितीची देखील, जिल्हा परिषद अधिनियमाच्या कलम २५६ च्या तरतुदींचा अवलंब करून, पुनर्रचना करण्यात येते. विद्यमान गटाची किंवा गटांची विभागणी करून उक्त कलम २५६ च्या खंड (घ) अन्वये तरतूद केल्यानुसार अशी रचना केल्याचा परिणाम म्हणून, नवीन गटाची किंवा गटांची उक्त अधिनियमाच्या कलम २५७ च्या खंड (दोन) मध्ये तरतूद केल्यानुसार, अशा संबंधित गटाच्या पंचायत समितीच्या सदस्यांना–जे शासनाच्या मते, अशा गटातून वगळलेल्या क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करीत असतील–काढून टाकणे, आणि तसेच उक्त कलम २५७ च्या खंड (चार) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, विद्यमान गटाच्या वगळलेल्या क्षेत्राचा समावेश असलेल्या अशा नवीन निर्माण केलेल्या गटासाठी, या अधिनियमाखाली नवीन (उत्तराधिकारी) पंचायत समितीची यथावकाश रचना करण्यात येईपर्यंत, त्या उत्तराधिकारी पंचायत समितीच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी प्रशासकाची नेमणूक करणे हे, शासनास आवश्यक आहे.

२. तथापि, संविधान (त्र्याहत्तरावी सुधारणा) अधिनियम, १९९२ च्या तत्त्वानुसार अशा विभागणीमुळे व उक्त कलम २५६ अनुसार विद्यमान पंचायत समितीच्या वा समित्यांच्या, यथोचितरीत्या निवडून आलेल्या सदस्यांना ते प्रतिनिधित्व करीत असलेल्या क्षेत्राला संबंधित विद्यमान गटांतून वगळल्याच्या परिणामी, त्यांना त्या पंचायत समितीचे सदस्य म्हणून काढून टाकल्यामुळे बाधा पोहोचलेल्या सदस्यांच्या लोकशाही अधिकारांचे व पदावधीचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, संविधानाच्या त्र्याहत्तराव्या सुधारणेपूर्वी करण्यात आलेल्या, उक्त कलम २५७ च्या तरतुदींमध्ये योग्य त्या सुधारणा करणे, शासनास इष्ट वाटते. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, पूर्वीच्या गटाचे किंवा गटांचे वगळलेले क्षेत्र किंवा क्षेत्रे समाविष्ट असणाऱ्या व अशा पंचायत समितीच्या अशा वगळलेल्या क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, काढून टाकलेल्या सदस्यांचा समावेश असणारी नवीन पंचायत समिती, किंवा, यथास्थिति, समित्या घटित करणारी मानीव तरतूद करण्याकरिता आणि तसेच अशा नव्याने घटित केलेल्या पंचायत समित्यांची मुदत ही, ज्या अशा प्रकारे विभागण्यात आल्या आहेत अशा विद्यमान पंचायत समित्यांच्या मुदतीबरोबरच समाप्त होणारी असेल, अशी आणखी तरतूद करण्याकरिता उक्त अधिनियमात २५७क हे नवीन कलम समाविष्ट करण्यात येत आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे. म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १९ ऑगस्ट २००४.

**मोहम्मद फज़ल,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एस. शहजाद हुसेन,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ६२ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

शनिवार, ऑगस्ट २१, २००४/श्रावण ३०, शके १९२६

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. XXV of 2004), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

PRATIMA UMARJI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. XXV of 2004), published under the authority of the Governor.]

---

**RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 21st August 2004.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXV OF 2004.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, for the purposes hereinafter appearing ;

Mah. V of 1962.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause *(1)* of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely:—

Short title and commencement.

1. *(1)* This Ordinance may be called the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Ordinance, 2004.

*(2)* It shall come into force at once.

Insertion of section 257A in Mah. V of 1962.

2. After section 257 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, the following section shall be inserted, namely:— Mah. V of 1962.

Division of Block or Blocks and its consequences.

"**257A.** *(1)* Where during the term of office of the members of any existing *Panchayat Samiti,* a notification is issued by the State Government under clause *(d)* of sub-section *(1)* of section 256 read with section 5, dividing a Block or Blocks and constituting two or more Blocks in its or their place, and consequent upon constitution of such new Block or Blocks, as the case may be, as provided under clause *(ii)* of section 257, the members of the existing *Panchayat Samiti* or *Samitis* representing the excluded area or areas are required to be removed, and a new *Panchayat Samiti* or *Samitis,* as the case may be, as provided under section 56 are required to be constituted, in such a case, notwithstanding anything contained in section 257 or any other provisions of this Act,—

*(a)* the area or areas so excluded by notification under clause *(d)* of sub-section *(1)* of section 256, from the existing Block or Blocks, as the case may be, and notified as constituting a new Block or Blocks, shall be deemed to have been constituted as a new *Panchayat Samiti* or *Samitis,* for such Block or Blocks, under section 56;

*(b)* the members so removed under clause *(ii)* of section 257 representing the area or areas excluded from the existing Block or Blocks shall be deemed to be the elected members of such newly constituted *Panchayat Samiti* or *Samitis,* as the case may be, and such members shall, from amongst themselves elect its Chairman and Deputy Chairman as provided under sections 67 and 68, respectively, of this Act;

*(c)* on constitution of the new *Panchayat Samiti* or *Samitis* under clause *(a)*, the State Government shall, by order published in the *Official Gazette,* provide for the transfer, in whole or in part, of the rights and liabilities of the existing *Panchayat Samiti* or *Samitis* to the newly constituted successor *Panchayat Samiti* or *Samitis,* as the case may be, and the terms and conditions of such transfer ; and such other incidental, consequential and supplementary matters as may be necessary to give effect to the notification issued under section 256 ; and

*(d)* all the relevant provisions of this Act in respect of the *Panchayat Samitis* shall apply to such newly constituted *Panchayat Samiti* or *Samitis.*

*(2)* The term of the newly constituted *Panchayat Samiti* and its members shall be co-terminus with that of the existing *Panchayat Samiti* by the division of which the new *Panchayat Samiti* has been constituted.".

STATEMENT.

On creation of new talukas by the Government under the Maharashtra Land Revenue Code, 1966, generally the Block or Blocks constituted under section 5 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and the respective *Panchayat Samitis* of such Blocks are also reconstituted, taking recourse to the provisions of section 256 of the Zilla Parishads Act. Consequent upon such constitution of new Block or Blocks as provided under clause (*d*) of the said section 256, by dividing the existing Block or Blocks, it is necessary for the State Government as provided, in clause (*ii*) of section 257 of the said Act, to remove the members of the *Panchayat Samiti* of such respective Block, who in the opinion of the State Government represent the areas excluded from such Block and as further provided in clause (*iv*) of the said section 257, pending constitution of new (successor) *Panchayat Samiti* in due course under the Act for such newly created Block comprising the excluded area of the existing Block, to appoint an administrator to exercise powers and to perform the duties and functions of the successor *Panchayat Samiti.*

2. However, in consonance with the spirit of the Constitution (Seventy-third Amendment) Act, 1992, in order to protect the democratic rights and the official term of office of the duly elected members of the existing *Panchayat Samiti* or *Samitis* affected by such division, and their consequent removal as a member of that *Panchayat Samiti* on account of the exclusion of the area represented by them from the respective existing Block under the said section 256 it is considered expedient by the Government that the provisions of the said section 257, which have been enacted prior to the Constitution Seventy-third Amendment, should be suitably amended. To achieve this objective, a new section 257A is being inserted in the said Act providing for a deeming provision, constituting a new *Panchayat Samiti* or *Samitis,* as the case may be, comprising the excluded area or areas of the then Block or Blocks and consisting of the members removed representing such excluded areas of such *Panchayat Samitis,* and to further provide that the term of such newly constituted *Panchayat Samitis* shall be co-terminus with the term of the existing *Panchayat Samitis,* which have been so bifurcated.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,

Dated the 19th August 2004.

MOHD. FAZAL,

Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. SHAHZAD HUSSAIN,

Principal Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई